# मुददा क्र. 17

# इतर माहिती

उदयान व वृक्षसंवर्धन विभागाचे मुख्य कार्यालय यशवंतराव चव्हाण गुलाबपुष्प उदयान, टी. ब्लॉक हॉकी स्टेडियमजवळ, भोसरी. पुणे. पिन – 411026 या ठिकाणी आहे. नागरिकांसाठी संपर्क करण्यासाठी फोन नंबर – 7722060907 आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत शहरात अनेक उदयाने आहेत. उदयानांमध्ये अनेक देखावे तयार केले आहेत. तसेच शहराच्या सौंदर्यात भर पडण्यासाठी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली आहे. तसेच काही ठिकाणी फुलांच्या रोपांची लागवड केली आहे. शोभीवंत रोपांची पण लागवड केली आहे. रस्त्यामधील डिव्हायडर मध्ये रोपे लावली आहेत. सेक्टर 27, प्राधीकरण, निगडी या ठिकाणी नागरिकांसाठी रोपे विक्रीस उपलब्ध आहेत. श्री. संतोष लांडगे (लिपिक) - 9850080123

धोकादायक झाडे काढण्यासाठी मा. वृक्ष प्राधिकरण समितीच्या मान्यतेने व फांदयांची छाटणी करण्यासाठी पर्यवेक्षक यांचा अहवाल आल्यावर सहाय्यक आयुक्त यांच्या मान्यतेने नागरिकांना परवानगी देण्यात येते. उदयानामध्ये शालेय विदयार्थ्यांच्या सहलीसाठी अटी व शर्तीस अधीन राहुन परवानगी देण्यात येते. सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रमासाठी शुल्क आकारुन शोभीवंत कुंडया भाडे तत्वावर देण्यात येतात. माझी वसुंधरा योजनेची अंमलबजावणी चालु आहे. शहर हरित होण्यासाठी प्रयत्न चालु आहेत.